I J R S S I S, Vol. V, March 2017: 458-460 ISSN 2347 – 8268

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.MH-659/13(N)
www.vmsindia.org

# संस्कृती परंपरा आणि खेळ

**बोंडे अ. श्री.**

कला वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब, दारव्हा, जि. यवतमाळ (म.रा.) भारत

Email: *ajaysbonde@gmail.com*

**सरांश:**

**प्रस्तावना:** भारताला हजारों वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे. यामध्ये संस्कृती, परंपरा व खेळ यांना मानाचे स्थान असल्याचे इतिहासावर नजर टाकल्यास दिसून येते. याच संस्कृती आणि परंपरेचा टेंभा आपण जगभर घेवून मिरवित असतो. वैदिक संस्कृती, सिंधू अथवा हडप्पा संस्कृती, बौद्ध, जैन अशा अनेक कालखंडातील संस्कृती आणि परंपरा अतिशय प्रगल्भ होत्या आणि त्यामुळेच भारत जगभरात विख्यात होता. भारतात सोन्याचा धूर निघत असे हे विधान त्यावरुनच केल्याचे दिसून येते. अशा या गौरवशाली परंपरा आपण भारतील जर विसरु लागलो तर मग आपल्या सांस्कृतिक धरोहरेच काय? म्हणून त्या जोपासने, त्याचा प्रचार–प्रसार करणे व त्याला वाढीस लावण्याचे काम प्रत्येकाने आपले कर्तव्य समूजन केले पाहिजे. त्यातील 'खेळ' हा सुद्धा फार महत्वाचा घटक आहे. अशा गौरवशाली परंपरेतील खेळाचे संगोपन आणि संवर्धन करायलाच हवे.

तामिळनाडुतील जलिकट्टू, महाराष्ट्रातील बैलगाडी शर्यत म्हणजेच शंकरपट, तळकोकणातील चिखलगुट्टा ह्या स्पर्धावर माननीय सर्वोच्च न्यायालयाने बंदी घालत्यामुळे तामिळनाडुतील ग्रामीण जनता या विरोधात प्रचंड मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरली व त्याचे लोन मग शहरात सुद्धा पसरले व संपूर्ण तामिळनाडुत आंदोलनाचा वणवा भडकला. त्यामुळे राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. चेन्नईच्या मरिना बिचवर लाखों लोकांनी एकत्र येवून या निर्णयाचा विरोध केला. तत्कालिन मुख्यमंत्री पनीर सेलव्म यांनी मग माननीय पंतप्रधान नरेंद्र मोंदी यांना बंदी उठविण्याबाबत साकळे घातले व तामिळनाडू सरकारने कायदा करुन त्याला माननीय राज्यपाल यांनी या कायद्यावर स्वाक्षरी करुन स्पर्धा आयोजनाचा मार्ग मोकळा केला. संपूर्ण तामिळनाडुत मग मोठ्या उत्साहात हा खेळ 'पोंगल' च्या तिसऱ्या दिवशी परंपरेप्रमाणे साजरा केला.

त्या अनुषंगाने तामिळनाडुतील जनतेने प्रश्न उपस्थित केला की, भारतीय संस्कृती आणि प्रथा–परंपरेवर जर घाला येत असेल तर त्या विरोधातील जनक्षोभ हा किती हे तामिळनाडुतील जनतेने प्रचंड प्रमाणात विरोध करुन निदर्शनास आणून दिला. माननीय सर्वोच्च न्यायालयाने यावर 'पेटा' या प्राणीमात्राच्या हक्कासाठी लढणाऱ्या जागतिक संघटनेने दाखल केलेल्या याचिकेवरुन बंदीचा निर्णय दिला. या संस्थेचे म्हणणे असे की, या स्पर्धेदरम्यान बैलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले जातात. परंतु या उलट जनतेचे म्हणणे असे की, एवढ्या मोठ्या स्पर्धेदरम्यान काही ठिकाणी गालबोट त्याला लागत असेल परंतु सर्रासच असे होते असे नाही. म्हणूनच २५०० वर्षांची परंपरा असलेल्या या ग्रामीण संस्कृतीवरच घाला आहे असे जनतेचे म्हणणे आहे. पेटा ही विदेशी संस्था आहे मग जनतेने काही गोष्टींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जसे बूल फाईटवर इतर देशात बंदी आहे काय? चामड्याच्या व्यापारावर बंदी आहे काय? गायी, बैल, म्हशी, शेळी, मेंढी या प्राणीमात्रांच्या कत्तलीवर बंदी आहे काय? घोड्याच्या

शर्यतीवर बंदी आहे काय? इत्यादि. जलिकट्टूवर 'टक्कारु टक्कारु' व्हिडिओ तयार करणार संगीतकार आदित्य म्हणतो की, जलिकट्टू हा खेळ नसून ते 'प्रजनन विज्ञान' आहे. याबाबत जनतेच्या भावना अतिशय तीव्र होत्या.

भारतीय संस्कृतीत शेतीला फार महत्व आहे. भारत हा ७० खेड्यत राहतो व तेथील प्रमुख व्यवसाय हा शेतीच आहे. म्हणूनच भारताला कृषिप्रधान देश म्हटल्या जाते. भारताची अर्थव्यवस्थाच कृषिवर आधारित आहे. अशा या कृषिप्रधान देशात गायी आणि बैलाला फार मानाचे स्थान आहे. भारतात गायीला 'गौमाता' म्हणतात तर शेतकारी कुटुंबात बैलाला स्वत:च्या मुलाप्रमाणे जपले जाते याची अनेक उदाहरणे आपल्या सभोवताल पाहायला मिळतात. उदा. मराठवाड्यतील घटना या ठिकाणी सांगता येईल. मराठवाड्यत तीन वर्षाआधी भीषण दुष्काळ होता. बैलांना चारा नाही, प्यायला पाणी नाही, अन्नधान्याचा तुटवडा अशा परिस्थितीत शेतकरी हवालदिल झाला होता. अशाच एका शेतकऱ्याने आपल्या पोटच्या पोराप्रमाणे सांभाळलेल्या बैलजोडीचे हाल पाहवत नसल्यामुळे व कर्जाचा बोजा डोक्यावर वाढत असल्यामुळे विक्रीचा निर्णय घेतला व तसा त्याने घरी बोलून दाखविला. त्याचा शाळकरी मुलाने त्याचा विरोध केला कारण त्या मुलाला बैलजोडीचा फारच लळा होता. हे भावनिक नाते वडिलांना माहीत होते. तेव्हा वडिलांनी मुलाला शाळेत जावू दिले व नंतर बैलजोडी बाजारात कमी किमतीत विकावी लागली. मुलगा शाळेतून परत आल्यावर बैलजोडी दिसत नसल्यामुळे कासाविस झाला. आईला विचारल्यावर बैलजोडी विकल्याचे समजले. त्यामुळे व्यथित होवून त्या शाळकरी मुलाने आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली. असे भावनिक नाते बैलाचे आणि शेतकऱ्याचे आहे. दुसरे उदाहरण म्हणून शंकरपटासाठी ज्या 'खिल्लार' बैलाची पैदास मराठवाड्यत केली जाते त्याची किंमत लाखोच्या घरात असते. अशा बैलाची निगा पोटच्या पोरापेक्षाही शेतकारी चांगल्या पद्धतीने राखतो व त्यातून त्याला चांगला आर्थिक मोबदला सुद्धा मिळतो. म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा तो एक भाग सुद्धा आहे. विजय मस्कर मराठवाड्यतील त्यांच्या जोडीची किंमत लाखोच्या घरात आहे. परंतु या बंदीमुळे या बैलांच्या किमती अगदीच कमी झाल्या आहेत. ते म्हणतात आम्ही बैलांना मुलाप्रमाणे वागवितो. "ज्या दिवशी आमची जोडी शर्यत हारते त्या दिवशी बैल पाणी पित नाही आणि चाराही खात नाही. तसेच त्याच्या कुटुंबात एखाद्याचा मृत्यू झाल्यास त्या दिवशी सुद्धा बैल खातपित नाही." इतके भावनिक नाते शेतकरी आणि बैलात असते. अशा बैलांवर अत्याचार शेतकरी कसा करणार असा सवाल ते करतात.

पूर्वीच्या काळी करमणुकीची साधने उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी बैलांच्या स्पर्धा भरवीत. त्यासाठी परिसरातील हजारों शेतकरी एकत्र येवून त्याचा नुसताच आनंद घेत नसत तर त्यासोबत व्यापार, सांस्कृतिक, सामाजिक विचारांची देवाण–घेवाण होत असे एवढी वैभवशाली परंपरा या स्पर्धांना तेव्हापासून तर आजतागायत सुरू आहे. म्हणून २५०० वर्षे जुन्या 'जलिकट्टू' या तामिळनाडुतील वा ३०० वर्ष जुन्या तळेगांव दशासर (विदर्भ) अशा तत्सम पुरातन वारसा लाभलेल्या स्पर्धा परत सुरु कराव्यात अशी मागणी जनतेतून सुरु आहे. त्यावर माननीय न्यायालयाने यथोचित चौकशी करुन, उपलब्ध पुरावे तपासून या गौरवशाली परंपरा परत कशा सुरु होतील यावर विचार करावा.

**दुष्परिणाम:**

१. या स्पर्धा बंदीमुळे ग्रामीण, कृषि संस्कृती नष्ट होवू शकते. आपल्या देशाच्या संस्कृतीचा गाभाच ग्रामीण संस्कृती आहे. तेव्हा अशा स्पर्धा बंदीमुळे हा गाभाच नष्ट होईल असे बोलल्या जात आहे.

२. शेतकऱ्यांच्या उपजिविकेचे साधन म्हणून याच स्पर्धांच्या बैलांची पैदास शेतकरी करतो. त्यात त्याला बऱ्यापैकी पैसा मिळतो. बंदीमुळे हा व्यवसाय थांबला आहे. म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. आपल्या देशात 'गोधन' याला प्राचीन काळापासून अतिशय महत्व प्राप्त आहे. या स्पर्धांमधूनच गोधन संवर्धनाचा संदेश शेतकरी देत असतो. तेव्हा या तत्वालाच हरताळ फासल्यासारखे होईल.

४. संस्कृती व परंपरा संवर्धन हे आपले प्रथम कर्तव्य आहे. या स्पर्धांचा संबंध थेट त्याच्याशीच आहे.

५. शेतकरी व बैल यांचे भारतीय संस्कृतील नाते अतूट आहे. हे फार विस्तृत स्वरुपात सांगायची गरज नाही. हे नाते कशाचे द्योतक आहे हे 'पेटा' ला वेगळे सांगायची गरज नाही.

६. घोड्यांच्या शर्यतीवर बंदी का नाही?

७. आयपीएल ह्या क्रिकेटच्या स्पर्धा एप्रिल महिन्यात घेतल्या जातात. त्यासाठी पाण्याचा, विजेचा वारेमाप खर्च होतो. ध्वनि प्रदुषण वेगळेच. विद्यार्थ्यांच्या परीक्षा याच महिन्यात असतात, सट्टेबाजारामुळे गुन्हेगारीला चालना मिळते. मग यावर बंदी का नाही? ह्या स्पर्धा नेमकी कोणती संस्कृती व परंपरेला चालना देतात.

असे अनेक प्रश्न या निमित्त्याने विचारल्या जावू लागले आहेत.

**संदर्भ:**


१. **राजू शेट्टी,** "होऊ द्या बैलगाडी शर्यत", दै. लोकसत्ता, दि. १ मार्च २०१७, पृ.क्र. ७

२. **प्रदीप देशपांडे,** "परंपरा की हिंसाचार", दै. जनमाध्यम, दि. २२ जानेवारी २०१७, पृ.क्र. ५

३. संपादकीय, "जलिकट्टूचा संघर्ष", दै. हिंदुस्थान, दि. २२ जानेवारी २०१७, पृ.क्र. ५

४. **दिव्या बालचंदर,** "रेड फ्लॅग ओव्हर तामिळनाडू", द इकोनोमिक्स टाईम्स मॅगझिन, दि. २२—२८ जानेवारी २०१७, पृ.क्र. २, १८, १९

५. **वार्ताहार,** "शंकरपटाची ३०० वर्षाची परंपरा बंदीमुळे तुटणार का?", दै. जनमाध्यम, दि. २० डिसेंबर २०१७.

६. **डॉ. नीलकंठ पु. जोशी,** "भारतीय व्यायाम—विद्या", मथुरा.

७. **श्रीकांत जाधव,** "प्राचीन भारत", दै. लोकसत्ता, दि. ९ मार्च २०१७, पृ.क्र. १४

८. **नरगीश सुनावाला,** "जलिकट्टू एजिटेशन स्पाकस् होप ऑफ रिव्हिव्हिंग स्टेटस् ओन स्पोर्ट", दै. संडे टाईम्स्, दि. २२ जानेवारी २०१७.

९. **अरुण जनार्दन,** दै. इंडियन एक्सप्रेस, दि. २२ जानेवारी २०१७, पृ.क्र. १, २


******